Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सहसंबंधाचा अभ्यास

**डॉ. विजेंद्र श्रीकृष्ण पुराणिक**
सहायक प्राध्यापक
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर जि. धुळे

***सारांश***

*प्रस्तुत संशोधनात, कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सहसंबंधाचा अभ्यास वर्णनात्मक संशोधन पद्धतीने केला आहे. सहेतुक नमुना निवड पद्धतीने एकूण १२० शिक्षकांची निवड करण्यात आली. माहितीचे संकलन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित सामाजिक व्यावसायिक कौशल्य मापिकेचा अवलंब करण्यात आला आहे. तर अध्यापन अभियोग्यता मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित अध्यापन अभियोग्यता मापिकेचा अवलंब करण्यात आला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी करण्यासाठी सहसंबंध गुणक या संख्याशास्त्रीय परिमाणाचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधनात निष्कर्ष: कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध दिसून येतो.*

**प्रस्तावना**

शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची आणि राष्ट्राच्या विकासाची मूलभूत प्रक्रिया आहे. शिक्षण व्यवस्थेतील शिक्षक हा सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. शिक्षकांचे ज्ञान, अध्यापन कौशल्य, व्यावसायिक मूल्ये तसेच सामाजिक वर्तन यांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि व्यक्तिमत्त्व विकासावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे शिक्षकांच्या सामाजिक व्यावसायिक कौशल्यांचा आणि अध्यापन अभियोग्यतेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. सामाजिक व्यावसायिक कौशल्य म्हणजे शिक्षकांची प्रभावी संवाद क्षमता, सहकार्याची भावना, नेतृत्वगुण, सामाजिक उत्तरदायित्व, व्यावसायिक नैतिकता, सहकाऱ्यांशी व विद्यार्थ्यांशी सकारात्मक संबंध प्रस्थापित करण्याची क्षमता इत्यादी गुणांचा समावेश होय. या कौशल्यांमुळे शिक्षकांना शैक्षणिक वातावरणात प्रभावीपणे कार्य करता येते. सामाजिक व्यावसायिक कौशल्ये शिक्षकांच्या व्यावसायिक

कार्यक्षमतेस बळकटी देतात आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेला अधिक परिणामकारक बनवतात. अध्यापन अभियोग्यता म्हणजे शिक्षकांची अध्यापन करण्याची नैसर्गिक क्षमता, अध्यापनातील अभिरुची, विद्यार्थ्यांना समजून घेण्याची वृत्ती, वर्गव्यवस्थापन कौशल्य, अध्यापन नियोजन आणि शिकवण्यातील प्रभावीपणा होय.

आजच्या बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत शिक्षकांकडून केवळ विषयज्ञानाची अपेक्षा नसून सामाजिक व व्यावसायिक दृष्टिकोनातून सक्षम असण्याचीही अपेक्षा केली जाते. विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, बदलती सामाजिक मूल्ये आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज यामुळे शिक्षकांच्या सामाजिक व्यावसायिक कौशल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांच्या कार्यपरिस्थिती, सामाजिक वातावरण आणि उपलब्ध संसाधनांमध्ये काही प्रमाणात भिन्नता आढळून येते. या भिन्नतेचा त्यांच्या सामाजिक व्यावसायिक कौशल्यांवर आणि अध्यापन अभियोग्यतेवर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे या दोन्ही घटकांमधील संबंध समजून घेणे आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर "कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सहसंबंधाचा अभ्यास" हा संशोधन विषय निवडण्यात आला असून, शिक्षकांच्या सामाजिक व्यावसायिक कौशल्यांचा त्यांच्या अध्यापन अभियोग्यतेशी असलेला संबंध शोधण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारे करण्यात आला आहे. हा अभ्यास शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी तसेच शिक्षणाची गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**समस्या विधान**

शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे**

१. शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.

२. शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.

३. शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सह्संबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती**

- **संशोधन पद्धती-** कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.
- **जनसंख्या-** प्रस्तुत संशोधनासाठी, शिरपूर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शहरी व ग्रामीण भागात अध्यापन करणारे सर्व स्त्री व पुरुष शिक्षक यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली आहे.
- **न्यादर्श-** प्रस्तुत संशोधनात सहेतुक नमुना निवड पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालयाच्या तिन्ही शाखेच्या इयत्ता अकरावी व बारावीच्या वर्गाला अध्यापन करणारे एकूण १२० शिक्षकांची (शहरी ६० + ग्रामीण ६०) नमुना म्हणून निवड करण्यात आली होती.
- **संशोधन साधने-** प्रस्तुत संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी खलील संशोधन साधनाचा अवलंब केला आहे.

१. **सामाजिक व्यावसायिक कौशल्य मापिका-** प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित सामाजिक व्यावसायिक कौशल्य मापिकेचा अवलंब करण्यात आला आहे. त्यात एकुण २५ विधाने आहेत. विद्यार्थ्यांना प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत, सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले आहेत. सदर मापिका संशोधन क्षेत्रातील अभ्यासक व्यक्तींकडून तपासून घेण्यात आली आहे.

२. **अध्यापन अभियोग्यता मापिका-** प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील अध्यापन अभियोग्यता मापन करण्यासाठी संशोधकाची स्वनिर्मित अध्यापन अभियोग्यता मापिकेचा

अवलंब करण्यात आला आहे. त्यात एकूण २५ विधाने आहेत. विद्यार्थ्यांना प्रतिसाद नोंदविण्यासाठी सहमत, असहमत, सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले आहेत. सदर मापिका संशोधन क्षेत्रातील अभ्यासक व्यक्तींकडून तपासून घेण्यात आली आहे.

- **संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सहसंबंध गुणक या संख्याशास्त्रीय परिमाणाचा उपयोग करण्यात आला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन**

प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी व ग्रामीण भागातील शिक्षकांनी सामाजिक व्यावसायिक कौशल्य मापिका व अध्यापन अभियोग्यता मापिकेला दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण पुढील प्रमाणे करण्यात आले आहे.

**परिकल्पना ०१: कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०१**

| कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| सामाजिक व्यावसायिक कौशल्य | १२० | ०.१७९ | ०.६९५ | त्याग |
| अध्यापन अभियोग्यता | १२० | | | |

**निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०१ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य ०.६९५ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ सार्थकता स्तरावर) ०.१७९ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य ०.६९५ हे दर्शवते की सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यांच्यात मजबूत आणि धनात्मक सहसंबंध आहे. ज्या शिक्षकांमध्ये सामाजिक व्यावसायिक कौशल्य उत्तम असतात, त्यांची अध्यापन अभियोग्ता देखील चागंली असते.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

**परिकल्पना ०२ : कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०२**

| कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी भागातील शिक्षक | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| सामाजिक व्यावसायिक कौशल्य | ६० | ०.१७९ | ०.६८८ | त्याग |
| अध्यापन अभियोग्यता | ६० | | | |

**निरीक्षण व निष्कर्ष** - तक्ता क्रमांक- ०२ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य ०.६८८ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ सार्थकता स्तरावर) ०.१७९ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य ०.६८८ हे दर्शवते की सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यांच्यात मजबूत आणि धनात्मक सहसंबंध आहे. ज्या शहरी भागातील शिक्षकांमध्ये सामाजिक व्यावसायिक कौशल्य उत्तम असतात, त्यांची अध्यापन अभियोग्यता देखील चांगली असते.

**परिकल्पना ०३: कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०३**

| कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण भागातील शिक्षक | नमुना | सारणी 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|
| सामाजिक व्यावसायिक कौशल्य | ६० | ०.१७९ | ०.६९८ | त्याग |
| अध्यापन अभियोग्यता | ६० | | | |

**निरीक्षण व निष्कर्ष** -

तक्ता क्रमांक- ०३ नुसार, प्राप्त 'r' मूल्य सारणी 'r' मूल्यापेक्षा मोठे आहे. प्राप्त 'r' मूल्य ०.६९८ आहे, जे सारणी 'r' मूल्य (०.०५ सार्थकता स्तरावर) ०.१७९ पेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा (Null Hypothesis) त्याग करावा लागेल. याचा अर्थ, कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सहसंबंध आढळून

येतो, तसेच यात धनात्मक सहसंबंध दिसून येतो. प्राप्त 'r' मूल्य ०.६९८ हे दर्शवते की सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यांच्यात मजबूत आणि धनात्मक सहसंबंध आहे. ज्या ग्रामीण भागातील शिक्षकांमध्ये सामाजिक व्यावसायिक कौशल्य उत्तम असतात, त्यांची अध्यापन अभियोग्यता देखील चागंली असते.

**निष्कर्ष**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सह्संबंध आढळून येतो.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील शहरी भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सह्संबंध आढळून येतो.

३. कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण भागातील शिक्षकांमधील सामाजिक व्यावसायिक कौशल्य व अध्यापन अभियोग्यता यात सार्थ सह्संबंध आढळून येतो.

**निष्कर्षावर आधारीत चर्चा**

वरील निष्कर्षावरून असे स्पष्ट होते की सामाजिक व्यावसायिक कौशल्ये ही अध्यापन अभियोग्यतेच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घटक आहेत. प्रभावी संवाद, सहकार्य, नेतृत्व, व्यावसायिक जबाबदारी, सामाजिक संवेदनशीलता आणि सकारात्मक मानवी संबंध या गुणांचा अध्यापनाच्या गुणवत्तेवर सकारात्मक प्रभाव पडतो. त्यामुळे शिक्षकांच्या अध्यापन कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी त्यांच्या सामाजिक व्यावसायिक कौशल्यांच्या विकासावर भर देणे आवश्यक आहे. शिक्षक प्रशिक्षण संस्था, महाविद्यालयीन प्रशासन आणि शैक्षणिक मंडळांनी या कौशल्यांच्या संवर्धनासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा आणि व्यावसायिक विकास उपक्रम राबविणे गरजेचे आहे. अशा प्रयत्नांमुळे शिक्षकांची अध्यापन अभियोग्यता अधिक प्रभावी होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेतही सुधारणा होऊ शकते.

**संदर्भग्रंथसूची**

कदम, चा. प. (१९८९), *शैक्षणिक संख्याशास्त्र* पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

पंडीत बं. बि. *शिक्षणातील संशोधन.* पुणे: नूतन प्रकाशन.

पंडीत र. वि. *शैक्षणिक मानसशास्त्र.* नागपूर: पिंपळापुरे प्रकाशन.

पंडीत, ब.बि. (२००७). *शिक्षणातील संशोधन,* पुणे: नित्यनुतन प्रकाशन.

पवार, ना. ग. (२००८), *उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण.* पुणे:नित्य नूतन प्रकाशन.